# युरोपात पुरस्कार मिळालेले चित्रपट ‘पिफ‘मध्ये दाखवणार

पुणे, दि. १८ जानेवारी २०२६ : नुकत्याच झालेल्या युरोपियन चित्रपट पुरस्कारांमध्ये पुरस्कार मिळालेल्या ‘सिरात’ आणि ‘सेंटिमेंटल व्हॅल्यू’ हे दोन्ही चित्रपट पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा( पिफ ) मध्ये दाखवण्यात येत आहेत.
‘सिरात’ला युरोपियन चित्रपट पुरस्कारांमध्ये छायाचित्रण, संकलन, कास्टिंग डायरेक्टर (मारिया रॉड्रिगो), प्रोडक्शन डिझायनर, साउंड डिझायनर असे पुरस्कार मिळाले आहेत. हा चित्रपट ‘पिफ’ मध्ये शनिवारी दुपारी दाखवण्यात आला. पुन्हा १९ जानेवारी  इ स्क्वेअर येथे सायंकाळी ५ वाजता स्क्रीन क्रमांक ५ ला दाखवण्यात येणार आहे.

‘सेंटिमेंटल व्हॅल्यू’ या चित्रपटाला युरोपियन चित्रपट पुरस्कार, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री आणि पटकथा लेखक असे विविध पुरस्कार मिळाले आहेत. ‘सेंटिमेंटल व्हॅल्यू’ हा चित्रपट सोमवारी १९ जानेवारीला पीव्हीआर स्कीन क्रमांक ३ ला दुपारी २:२० वाजता दाखवण्यात येणार आहे.
‘पिफ’च्या चित्रपट निवड समितीचे सदस्य अभिजीत रणदिवे म्हणाले, की दरवर्षी उत्तमोत्तम चित्रपट निवडून ‘पिफ’मध्ये दाखवण्याचा प्रयत्न असतो. पुण्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरचा दर्जेदार चित्रपट पाहता यावा, हा यामागचा उद्देश असून, त्या चित्रपटांना पुरस्कार मिळाल्याने पुणेकरांना महत्त्वाचे चित्रपट पाहता येतील.”